# श्री नृसिंहसरस्वती प्रार्थना

Shri Nrusinha Saraswati Prarthana — Prayer to Shri Nrusinha Saraswati

॥ श्री गणेशाय नमः ॥

॥ ॐ द्रां दत्तात्रेयाय नमः ॥

अनसुयात्मज हे जगपालका ।
तुजविण कुणी ना जगी बालका।
तरी कधी मी स्मरुं कवणांप्रती ।
शरण मी नरसिंह सरस्वती ।१।

मग मला गमला पथ हा बरा ।
तव पदीच असो नित्य आसरा ।
पुरती हेतू कधी मम हे कधी ।
करी दया नरसिंहसरस्वती ।२।

मज कडोनिच घेऊनी चाकरी।
मगही देशील योग्य ने ते जरी।
शिशुस मोबदला कुणी मागती।
कथी बरे नरसिंहसरस्वती ।३।

नति तुझ्या अर्पिती किंकर ।
अभय दे शिरी ठेवी गुरो कर।
स्थिरमती रमती नित्य प्रार्थिती।
करी दया नरसिंहसरस्वती ।४।

मदीय लोचन सार्थक जाहले।

सगुण सदगूरु सद्रुप पाहिले।

बघ मना रूप मंगल हे किती।

करी दया नरसिंहसरस्वती ।५।

तवकृपेविण जीवची घाबरे।

अभय दे शिरी ठेवचि हस्त रे।

तव पथा गुरु वासचि पाहती।

करी दया नरसिंहसरस्वती ।६।

बहुत भोगियल्या गुरु आपदा।

चुकवी दावी आता तुझिया पदा।

द्रुतगती अजि धावती संकटी।

करी दया नरसिंहसरस्वती ।७।

कितीतरी अळवु तुज श्रीगुरु।

बहुतही श्रमले भवि लेकरु।

कशी दया तुजला लव ये न गा।

अनसूयात्मज भो मज पाव गा।८ ।।

तुझ समक्ष अरी मज गांजिती।

लवहरी तुजला कशी ना क्षिती।

उगिच का त्रिशुला धरीलें अगा।

अनसुतयात्मज भो मज पावगा।९ ।।

मदिय प्राण हरीलचि काळ तो।

मग तुझा ऊपयोगचि काय तो।

म्हणूनी मी पुसतो कधी येशी गा।

अनसुयात्मज भो मज पाव गा।१० ।।

सदयता ह्रदयी लव तू धरी ।

भजनी मंडळी हे गुरु उद्धरी ।

स्वकिय आप्त रिपू आणि निंदका

अनसुयात्मज भो मज पावगा ।११ ।।

अदयता धरिली अशी कां बरे ।

भवपूरी बुडतो जीव घाबरे ।

पुरवि हेतु न मी गुरुदास गा ।

अनसुयात्मज भो मज पाव गा ।१२ ।।